सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,**
**अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५.**

दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८२ E-mail : gcoeara@gmail.com Web-Site : www.gcoeara.ac.in
(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)

जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२४/ 2569 दि. 30 AUG 2024

# परिपत्रक

विषय:- सत्रपुर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेत प्रविष्ट होण्याच्या संधीबाबत.
संदर्भ-:सा.फु.पुणे विद्यापीठ यांचे पत्र क्र. परीक्षा/एस ॲन्ड टी/1343, दि.29/08/2024

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष् 2018-19 मध्ये प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थी अद्यापपर्यंत पदवी उत्तीर्ण झालेले नाही. अशा विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडून उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार विशेष बाब म्हणुन सत्रपुर्तता संपलेल्या परंतू संबंधित अभ्यासक्रम पुर्ण करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना समकक्षता देवून व कायद्याच्या कक्षेत राहून परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी म्हणून शैक्षणिक वर्ष 2024 मधील (ऑक्टोबर/नोव्हेंबर 2024 व एप्रिल/मे 2025) या दोन परीक्षेच्या शेवटच्या दोन संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

तरी आपल्या विभागात असे विद्यार्थी असल्यास त्यांना संपर्क साधून त्वरीत परीक्षा अर्ज भरण्यास सांगण्यात यावे. तसेच विद्यापीठाने कळविलेनुसार आपल्या विभागातील एकही पात्र विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहणार नाही याची सर्वतोपरी काळजी आपल्या स्तरावर घ्यावी. (सोबत संदर्भीय पत्र जोडलेले आहे.)

30-8-24
(डॉ. दि.रा.पानगव्हाणे)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ता.आंबेगाव जि.पुणे

प्रत-1. विभागप्रमुख- अणुविद्यूत/ उपकरणीकरण /संगणक /स्वयंचल / स्थापत्य /यंत्र /उपयोजित /कर्मशाळा यांनी सदर परिपत्रक व सोबतचे पत्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून तसे सुचित करावे.
2. डी.पी.यु.यांनी सदर पत्र सर्व विभागप्रमुखांना मेल करावी. तसेच संकेतस्थळावर प्रदर्शित करावी.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website : www.unipune.ac.in.

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune - 411007
Phone: 2025621398
E-mail: bee@pun.unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा/एस अॅण्ड टी/ 1343 दिनांक : 26.8.2024

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा)

**विषय : सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेत प्रविष्ट होण्याच्या संधीबाबत...**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यांत येते की, मा. विद्यापरिषदेने दिनांक २२ जून, २०२४ रोजीच्या सभेमध्ये सत्रपूर्तता संपलेल्या परंतु, शिक्षण/संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना समकक्षता देवून व कायद्याच्या कक्षेत राहून परीक्षेस प्रविष्ट होण्याची शेवटच्या दोन संधी देण्यास मान्यता दिलेली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे तसेच मा. विद्यापरिषदेने दिलेल्या मान्यतेनुसार सत्रपूर्तता ही शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मधील दोन अतिरिक्त संधी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देण्यात येत आहे.


Govt.C.O.E.Awasari
Dt. 27 AUG 2024
Inward No. 4586


| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा कालावधी | अतिरिक्त दोन वर्षे | अतिरिक्त एक वर्ष (मा. विद्यापरिषदेच्या निर्णयानुसार) | अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील प्रवेश खालील शैक्षणिक वर्षात असणे आवश्यक |
|---|---|---|---|---|
| १ | ५ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा.बी.आर्च बी.ए.एल.एल.बी इत्यादी) | +2 | +1 | २०१७—१८ |
| २ | ४ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. बी.ई., बी.एच.एम.सी.टी. इत्यादी) | +2 | +1 | २०१८—१९ |
| ३ | ३ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. बीए/बीकॉम/ बीएस्सी, इत्यादी) | +2 | +1 | २०१९—२० |
| ४ | २ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. एमए/एमकॉम/ एमएस्सी/एमबीए इत्यादी) | +2 | +1 | २०२०—२१ |
| ५ | १ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. डिप्लोमा) | +2 | +1 | २०२१—२२ |

27/8

27-8-24

सत्रपूर्ततेअंतर्गत दोन संधी या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ आणि मार्च/एप्रिल, २०२५ या परीक्षांकरिता लागू राहतील. सत्रपूर्ततेकरिता केवळ उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थी पात्र असतील. सदर पात्र विद्यार्थ्यांचेच परीक्षा अर्ज ऑनलाईन स्वरूपात टप्याटप्याने भरून घेण्यात येत असून विद्यापीठामार्फत समकक्षतेप्रमाणे त्यांची परीक्षा विद्यापीठ परीक्षेवरोबर आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर सत्रपूर्तता अंतर्गत महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच याबाबत एकही विद्यार्थी परीक्षा विभागात पाठविण्यात येवू नये याची काळजी घेण्यात यावी, विहित वेळेत परीक्षा अर्ज सादर न करणे, विद्यार्थ्यांपर्यंत माहिती न पोहचणे यामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू शकतो याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय/संस्था यांची असेल.

सदर पत्रातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा. तसेच सत्रपूर्ततेअंतर्गत एकही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची सर्वतोपरी काळजी आपल्या महाविद्यालय/संस्था प्रशासनाने घ्यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Shri Rathod
परिपत्रक कार्यवाही
29/8/24

Mgnt-D:\Backup Old\AR & DR Letter\DR and AR File.docx